# अल्पसंख्यांक विभागातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर
# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

पनवेल (प्रतिनिधी) पनवेल तालुका कॉंग्रेस कमिटी अंतर्गत अल्पसंख्यांक विभागातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि.११) नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

शहरातील मार्केट यार्डमधील श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास तालुका कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, अल्पसंख्यांक विभागाचे तालुकाध्यक्ष मन्सूर पटेल, ज्येष्ठ नेते फारूख पटेल, माजी नगरसेवक सिराज सय्यद, आवेश मस्ते, माजी सरपंच अब्दुल रेहमान पटेल, काळुंद्रे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अनेष ढवळे, तळोजा जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी, शिरवली विभागीय अध्यक्ष शिवाजी दुर्गे, युवा नेते ताहिर पटेल, ओवे ग्रामपंचायतीचे उपसरपंच साजिद पटेल, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष जाकीर खान, अस्लम पटेल, बशीर पटेल आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

अल्पसंख्यांक विभागाच्या तालुका उपाध्यक्षपदी लतीफ नालखंडे, इर्शाद रमझान शेख, महमुद शेख, सरचिटणीसपदी मुख्तार.म.हुसेन पटेल, सहचिटणीसपदी अर्शद शब्बीर पिट्टू व माजिद इस्माईल दळवी, खजिनदारपदी जाफर शेख यांची तर सदस्य म्हणुन बशीर खान, जाफर मुल्ला आणि इरफान.अ.मिया पावले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.